# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 06/09/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### पोस्टे रामटेक हद्दीत साटक शिवारात गॅस सिलेंडर चे सहाय्याने मोहाफुल हातभट्टीतुन दारू गाळणा–या इसमावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 05/09/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील मौजा साटक शेत शिवारातील वाहत्या नाल्याला लागुन गॅस सिलेंडर शेगडी चे सहाय्याने तिन गावठी हातभटट्ी लावुन एक इसम मोहाफुल दारू गाळत असल्याचे खबरेवरून सदर पथकाने मौजा साटक शेत शिवारात रेड करून गॅस सिलेंडर चे सहाय्याने हातभट्टीतुन मोहाफुल दारू गाळणारा इसम नामे रामा देवचंद कुंभलकर, वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 1, साटक त. पारशिवनी, जि. नागपुर यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन 3 लोखंडी शेगडया, एक गॅस सिलेंडर, एक गॅस रेग्युलेटर, 1790 लिटर मोहाफुल सडवा रसायन, 75 लिटर मोहाफुल गावठी दारू व हातभट्टी दारू गाळण्याचे साहीत्य असा एकुण 2,12,500/–रू चा माल जप्त केला. आरोपीस जप्त मुद्देमालासह पोलीस स्टेशन रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन रामटेक करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, सपोनि राजीव कर्मलवार, पोना उमेश फुलबेल, पोशि विपीन गायधने, अमोल वाघ, रोहन डाखोरे यांनी पार पाडली.



# अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणा–या इसमावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 05/09/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना अवैधरित्या देशी दारूने भरलेले एक चार चाकी वाहन पोलीस स्टेशन खापा हद्दीतुन जाणार असल्याचे खबरेवरून सदर पथकाने फॉरेस्ट नाका टी–पाईंट समोरून पांढ–या रंगाचे मारूती सुझुकी वेग्नॉर कार क्र. MH-31-CM.5569 मधुन अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणारे दोन इसम नामे 1) विशाल शंभु मंडल, वय 21 वर्ष, रा. चनकापुर व 2) धिरज दिलीप सारे, वय 27 वर्ष, रा. दहेगाव रंगारी यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन 5 देशी दारूच्या पेटया ज्यामध्ये एकुण 240 नग देशी दारूच्या निपा किं. 14,400/–रू तसेच नमुद चार चाकी वाहन किं. 2,10,000/–रू. असा एकुण 2,24,400/– रू चा माल जप्त केला. आरोपींना जप्त मुद्देमालासह पोलीस स्टेशन खापा यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, सपोनि राजीव कर्मलवार, पोना राजु रेवतकर, किशोर वानखेडे, आशिष मुंगळे यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर